# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.09.2023** **वारःशुक्रवार**

1. नारी शक्ती वंदन विधेयकाला राज्यसभेत एकमतानं मंजुरी; विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या सर्व सदस्यांचे पंतप्रधानांनी मानले आभार
2. ऐतिहासिक विधेयकाच्या मंजुरीनंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित
3. राज्य सरकार धनगर आरक्षणाबाबत सकारात्मक असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
4. कांदा व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी पूर्ववत सुरू करावी-मंत्री दादाजी भुसे यांचं आवाहन आणि
5. दुसरी खेलो इंडिया महिला लीग स्पर्धा आजपासून पुण्यात

**महिला आरक्षण**

नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयक काल राज्यसभेत एकमतानं मंजूर झालं. 214 सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मत नोंदवलं. याआधी हे विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर करण्यात आलं होतं. या विधेयकाला संसदेची मंजुरी मिळाल्याने आता ते राष्ट्रपतींकडे पाठवण्यात येईल; त्यानंतर त्याचं कायद्यात रुपांतर केलं जाईल. या ऐतिहासिक विधेयकाच्या मंजुरीनंतर राज्यसभेचं कामकाज, नियोजित वेळेच्या एक दिवस आधीच; अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. लोकसभेत चांद्रयान तीन या यशस्वी मोहिमेबद्दल इस्रोचं अभिनंदन करणारा ठराव मंजूर केल्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं.

नारी शक्ती वंदन विधेयकावर दोन्ही सभागृहात विस्तृत आणि सकारात्मक चर्चा झाली, दोन्ही सभागृहातील 132 सदस्यांनी आपापली मतं मांडली, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत सांगितलं. विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या सर्व सदस्यांचे त्यांनी आभार मानले. या विधेयकामुळे देशवासियांमध्ये नवा विश्वास निर्माण होईल तसंच विविध राजकीय पक्षांच्या सकारात्मक विचारांमुळे महिला सक्षमीकरणाला नवी ऊर्जा मिळेल असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना, केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले की, विविध पक्षाच्या 72 सदस्यांनी चर्चेदरम्यान विधेयकाला सहमती दर्शवली. या विधेयकाचं जेव्हा कायद्यात रुपांतर होईल आणि त्याची अंमलबजावणी होईल, तेव्हा महिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या बाबतीत देश विकसित देशांच्याही पुढे असेल असं मेघवाल म्हणाले.

**मुख्यमंत्री**

नारी शक्ती वंदन विधेयकाला राज्यसभेनं सर्वसंमतीने मंजूरी दिली; हा क्षण महिलांसाठी गौरवाचा क्षण असून देशाच्या इतिहासात सुवर्णक्षराने लिहिला जाईल, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विधेयकाचं स्वागत केलं. याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**धनगर आरक्षण**

राज्य सरकार धनगर समाजाच्या पाठीशी असून धनगर आरक्षणाबाबत सकारात्मक आहे, अस आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं. या संदर्भात काल मुंबईत बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते, या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार, यांच्यासह अन्य मंत्री आणि धनगर समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री

म्हणाले की, न्यायालयात टिकू शकेल असे आरक्षण धनगर समाजाला देण्याची आमची भूमिका आहे; मध्य प्रदेश, बिहार आणि तेलंगण या राज्यात शासन निर्णय काढून काही समाजांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

त्या राज्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी धनगर समाजबांधवांच्या प्रतिनिधींसह शासकीय शिष्टमंडळ पाठविण्यात येईल. या शिष्टमंडळाचा अहवाल देशाचे ॲटर्नी जनरल यांच्याकडे पाठवला जाईल, आणि राज्य शासनाच्या पातळीवर निर्णय घेण्याबाबत मार्गदर्शन घेतलं जाईल असं आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलं.

**कांदा-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून कांदा लिलाव बंद आहेत, त्यामुळे बाजार समित्यांमधील कोट्यवधी रुपयांची उलाढाल ठप्प झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री दादाजी भुसे यांनी काल व्यापारी आणि बाजार समिती प्रतिनिधीची बैठक घेतली. येत्या मंगळवारी म्हणजेच 26 सप्टेंबरला पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या दालनात व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक होणार आहे; तोपर्यंत कांदा लिलाव बंद आंदोलन मागे घ्यावं आणि कांदा खरेदी पूर्ववत सुरू करावी असं आवाहन भुसे यांनी केलं. कांदा निर्यात शुल्क कमी करावं आणि नाफेड तसेच एनसीसीएफने खरेदी केलेला कांदा देशांतील बाजारपेठेत विकू नये अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे. दरम्यान, लिलाव बंद केल्याने कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी व्यापाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे; लासलगाव बाजार समितीनं 131 व्यापाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

**गौरी आगमन**

श्री गणेशाच्या आगमनानंतर काल राज्यात घरोघरी उत्साहात वाजत गाजत गौरींचं आगमन झालं. कोल्हापुरात पारंपरिक साज-श्रृंगार करुन महिला, मुलींनी पंचगंगा नदी, रंकाळा तलाव, राजाराम तलाव याठिकाणी जमून फेर धरून, फुगडी घालत, गौरी गीतं म्हणत गौरी आवाहनाचा सण उत्साहात साजरा केला. आज सर्वत्र अत्यंत भक्तिभावानं गौरींचं पूजन होत आहे.

**दप्तराविना शाळा**

शाळा आणि दप्तर या अतूट समीकरणाला फाटा देत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो हे दाखवून दिलं आहे; पिंपरी चिंचवड महापालिकेने महापालिकेच्या शाळांमध्ये एक दिवस दप्तराविना शाळा हा अनोखा प्रयोग राबवण्यात येत आहे. या उपक्रमाला विद्यार्थी आणि पालकांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. ऐकूया या अनोख्या उपक्रमाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सर्व 128 शाळांमध्ये दर शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम सुरू केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला आहे. शनिवार जो शाळेचा दिवस असतो तो आता गीत, कविता, गायन, प्रश्नमंजुषा, शाब्दिक खेळ, पाककला, चित्रकला, मैदानी खेळ अशा विविध उपक्रमांनी भरलेला आहे. सध्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची कला आत्मसात करत आहेत. काही विद्यार्थी पाककलेचे धडे घेत आहेत. तर काहींचे हात पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी  बागकाम, रोपांची लागवड करण्यात मग्न आहे. 'दप्तराविना शाळा' उपक्रमाने विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यासक्रमाबाहेरील त्यांच्या आवडी जाणून घेण्याची संधी मिळाली आहे. नृत्य, संगीत, चित्रकला किंवा नाटक यासारख्या कलात्मक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या प्रतिभेला प्रोत्साहन मिळत आहे. शाळेच्या वेशी पलीकडे असणाऱ्या जगात आत्मविश्वासाने पाऊल टाकण्यासाठी मुलांना घडवण्याचा हा प्रयोग इतर महापालिकांनाही मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. आकाशवाणी बातम्यांसाठि सीमा चोरडिया, पुणे.**

**सिंचन**

राज्यातील जलसंपदा विभागाचे अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डसह इतर वित्तीय संस्थांकडून अतिरिक्त निधी उभारून पुढच्या वर्षी सप्टेंबरपर्यंत प्रकल्पांची कामं पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिले. यासंदर्भात मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**<u>डेक्कन ओडिसी</u>**

डेक्कन ओडिसी ट्रेन 2 नव्या स्वरूपात आल्यामुळे राज्यातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटनात वाढ होईल, असा विश्वास पर्यटन मंत्री गिरीष महाजन यांनी काल व्यक्त केला. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथं महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या डेक्कन ओडिसी 2 या रेल्वेला काल महाजन आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. त्यानंतर ते बोलत होते. नव्या रूपातील डेक्कन ओडिसीमध्ये विविध बदल केले आहेत. याला 21 डबे आहेत. अलिशान आणि आरामदायी कक्ष तसंच एक कॉन्फरन्स हॉल देखील आहे. याशिवाय केबल टीव्ही, इंटरनेट, ग्रंथालय, म्युझिक प्लेअर यासह अनेक अत्याधुनिक सोयीसुविधाही आहेत.

**<u>मृत्यू- पालघर, रायगड</u>**

पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यामध्ये दीड दिवसांच्या गणपतींच्या विसर्जनादरम्यान दोन वेगवेगळ्या ठिकाणी 3 जणांचा तलावात बुडून मृत्यु झाला.

रायगड जिल्ह्यातल्या मुरूडजवळील समुद्रात काल मासेमारी नौका अचानक उलटली. यामध्ये एकाचा मृत्यू झाला. अन्य दोघांनी पोहत किनारा गाठल्याने त्यांचा जीव वाचला.

**<u>निवड</u>**

चीनमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या सुशिकला आगाशे आणि मयुरी लुटे यांची ट्रॅक सायकलिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. 14 पुरुष आणि 4 महिला असा 18 सायकलपटूचा भारतीय संघ आज चीनकडे रवाना होत आहे.

भंडारा जिल्ह्यामधील मोहाडी तालुक्यातील निलज-खुर्द इथली सुशिकला आणि भंडारा तालुक्यातील बेला इथली मयुरी या दोघी सामान्य शेतकरी कुटुंबातल्या आहेत. राज्य शासनाच्या क्रीडा प्रबोधिनी योजनेमध्ये निवड झाल्यानंतर, त्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचं प्रशिक्षण घेतलं. या दोघींची या वर्षातली ही पाचवी आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहे.

**<u>महिला खेलो इंडिया</u>**

दुसरी खेलो इंडिया महिला ॲथलेटिक्स लीग 2023 ही स्पर्धा आजपासून पुण्यात सुरु होत आहे. भारतीय क्रीडा प्राधिकरण प्रादेशिक केंद्र, मुंबई आणि महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेनं संयुक्तपणे यांचं आयोजन केलं आहे. पुण्यातील बाबूराव सणस मैदानावर या स्पर्धा होणार असून, त्यात देशभरातल्या प्रत्येक शहरातील सुमारे 300 खेळाडू 14 स्पर्धा प्रकारांमध्ये भाग घेत आहेत.

**<u>पाऊस</u>**

राज्यात विविध जिल्ह्यात काल पावसाने हजेरी लावली. पुणे सिंधुदुर्ग चंद्रपूर बीड सोलापूरमध्ये काल मध्यम ते जोरदार पाऊस पडला. वाशीम तालुक्यात वीज पडून एका महिलेचा मृत्यु झाला; तर अन्य दोन ठिकाणी वीज पडून 4 जनावरांचा मृत्यू झाला.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल.

# नमस्कार